सायंदैनिक

# गुड इव्हिनिंग City



goodeveningcity@gmail.com

११ ऑगस्ट २०२५, सोमवार | वर्ष १४ वे | अंक ११४ | पृष्ठे ६

योजनेमध्ये मोफत उपचार व शस्त्रक्रिया
बुलडाणा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल
क्रिटीकल केअर व ट्रॉमा सेंटर
पत्ता :- आरास ले आऊट, जांभरूण रोड, बुलडाणा (२४ तास सेवा उपलब्ध)
मो. 7575919191, 7575929292,7575939393, 9730650014
(MJPJAY) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना, (PMJAY) प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत योजना संलग्नित
संपुर्ण गटातील कुटूंबासाठी संपूर्ण प्रकाराच्या आजारांवरती मोफत व गुणवत्तापुर्ण उपचार व शस्त्रक्रिया इ.
खालील आजारावरील सुविधा संपूर्ण मोफत
१) नवजात बाळाचे आजार (NICU)
२) लहान मुलांचे संपूर्ण आजार व शस्त्रक्रिया (PICU)
३) मोठ्या मानसांचे संपूर्ण आजार व शस्त्रक्रिया (मेडिसिन ICU)
४) श्वासाचे आजार / मेंदुचे आजार व शस्त्रक्रिया.
५) किडनिचे आजार व मुतखड्याची शस्त्रक्रिया.
६) पोटाचे आजार व शस्त्रक्रिया तसेच दुर्बिनद्वारे शस्त्रक्रिया (Laproscopy)
७) अस्थिरोग विभाग व शस्त्रक्रिया
८) जळीत रूग्णांचे आजार व शस्त्रक्रीया. (Burn Unit)
९) ट्रॉमा व एक्सीडेंट सर्जरी व उपचार
१०) स्त्रिरोग व प्रसुतीरोग उपचार व शस्त्रक्रिया.
११) कान, नाक, घसा उपचार व शस्त्रक्रीया.
१२) दंतरोगाची सर्जरी व उपचार
१३) प्लास्टीक सर्जरी उपचार
१४) कॅन्सर उपचार, शस्त्रक्रिया व किमोथेरपी इत्यादीची सुविधा
योजनेसाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे :- १) ओरिजनल राशनकार्ड किंवा २) **कुटूंबातील सर्वांचे** ओरिजनल आधार्ड कार्ड. ३) आयुष्यमान कार्ड
टिप :- इमर्जसिंमध्ये फक्त रूग्णांच्या आधार कार्डच्या झेरॉक्स वरती सुध्दा रूग्णाला उपचार दिला जाईल.

# शिवसेनेचा बुलढाण्यात 'जनआक्रोशाचा' वार!

## कलंकित मंत्र्यांची हकालपट्टी झालीच पाहिजे; कलापथक अन् प्रतीकात्मक जिवंत देखावे ठरले लक्षवेधक







*शिवसेनेच्या जनआक्रोश आंदोलनात प्रतिकात्मक जीवंत देखाव्यांनी वेगळाच रंग भरला होता. विधानभवनाच्या कँटीनमध्ये आ. संजय गायकवाड यांचे राडा प्रकरण, मंत्री संजय शिरसाट यांचा पैशांनी भरलेल्या बॅगसह व्हायरल झालेला व्हिडीओ आणि मंत्री भरत गोगावले यांची तंत्र-मंत्राची अघोरी पूजा, असे देखावे आंदोलनात सामिल करण्यात आले होते.*

**बुलढाणा, ११ ऑगस्ट (गुड इव्हिनिंग सिटी) :** राज्यातील महायुतीच्या बेताल वक्तव्य करणाऱ्या आणि भ्रष्टाचारी कलंकित मंत्र्यांचा राजीनामाच्या मागणीसाठी शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्यावतीने आज जनआक्रोश आंदोलनाचा वार बुलढाण्यात करण्यात आला. जिजामाता प्रेक्षगार मैदानाच्या परिसरात धरणे आंदोलनातून, निदर्शनातून भ्रष्टाचारी आणि कलंकित मंत्र्यांची हकालपट्टी झालीच पाहिजे ... झालीच पाहिजे.. ही मागणी रेटून धरण्यात आली. म ᒥ

रमी खेळणारा कृषी मंत्री , गृहराज्यमंत्र्यांच्या कुटुंबाचा डान्सबार, पैशाचा बॅगा शेजारी ठेऊन घरात बसलेला मंत्री, अघोरी पूजा करणारा मंत्री, सामान्यांना ठोसा मारणारा लोकप्रतिनिधी अशा एकाहून एक प्रतिकात्मक जिवंत देखावे या आंदोलनात सादर करण्यात आले. हे देखावे लक्षवेधक ठरले. त्यानंतर पदाधिकाऱ्यांनी व नेत्यांनी महायुती सरकारच्या विरोधात आपल्या भाषणातून आक्रमक हल्ला चढवला. या आंदोलनाची सुरुवात जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा या महाराष्ट्र गीताने झाली. कलापथकांनी सादर केलेल्या दोन दिवसाची दुनिया पाहू द्या... आमच्या कष्टाचा आम्हाला खाऊ द्या अशा प्रकारच्या गीतांनी शेतकऱ्यांची व्यथा मांडली. जिल्हाभरातून आलेल्या शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी या धरणे आंदोलनात सहभाग घेतला.

### सरकारविरुद्धचा लढा सुरूच राहील : आ. सिद्धार्थ खरात..

हे शासन फसवेगिरी करून सत्तेवर आलेले आहे. खोटे आमिष देऊन आलेले आहे. महाराष्ट्रातील मंत्री, आमदार यांनी प्रगती, विकास यावर काम करायच सोडून मंत्री काय करतात हे जनता उघड्या डोळ्यांनी पाहत आहेत. कृषी मंत्री कोकाटे रमी खेळतो, मग म्हणतो शासन भिकारी आहे. सुसंस्कृत महाराष्ट्राला थोर परंपरा लाभलेली आहे, अशा असताना या महाराष्ट्रातील मंत्री कलंक लावण्याचे काम करत आहेत. भ्रष्टाचार करायचा आणि पैसे कमवायचे हाच उद्योग सुरू आहे. या आंदोलनात दाखवलेल्या प्रतिकात्मक देखाव्यांनी मंत्री कसे काम करत आहेत हे पुन्हा एकदा जिवंत झालं. आंदोलनाची ही सुरुवात आहे. शेतकऱ्यांना न्याय देण्याचा काम करून हे शेतकरी विरोधी सरकार खाली खेचण्यासाठी आगामी काळात हा लढा अधिक तीव्र करण्यात येईल असेही आमदार सिद्धार्थ खरात म्हणाले.

### राज्याची प्रतिमा खराब करण्याचं काम मंत्र्यांनी केले : जयश्री शेळके

आपले महाराष्ट्र राज्य महान आहे हे आपण देशात अभिमानानाने सांगतो. त्याच आपल्या राज्याचे मंत्री हनी ट्रॅप मध्ये अडकतात, मंत्री आईच्या नावाने डान्सबार चालवतात. कृषी मंत्री ऑनलाईन रमी खेळताना. एक एक कारनामे या सरकारचे बाहेर येत आहेत. एकपेक्षा एक वरचढ असे कारणाने त्यांचे आहेत. सत्ताधारी पक्षाचे आमदार सर्व सामान्य माणसावर बॉक्सिंग स्कील दाखवत मारहाण करत, कॅन्टीन केसरी म्हणून मिरवतात. तरी देखील राजीनामे घेतले जात नाहीत. राज्याची प्रतिमा रसळतला नेल्या जात आहे. ही दुर्दैवाची बाब आहे. लाडक्या बहिणीच्या निधीला कट लावण्यात आला असून मुख्यमंत्र्यांनी आणि सरकारने झोपेच सोंग घेतले असल्याची खरमरीत टीका राज्य प्रवक्ता जयश्रीताई शेळके यांनी केली.

### सत्ता टिकवण्यासाठी मुख्यमंत्री हतबल : जालिंदर बुधवत

शेतकऱ्यांना न मागता ही दोन लाख रुपयांची कर्जमाफी देणारे उद्धव साहेब हेच एकमेव शब्द पाळणारे नेते आहेत. शिवसेना ही कायम समाजासोबत राहत आलेली आहे. कुटुंबप्रमुख म्हणून उद्धव साहेबांनी या आंदोलनाबाबत आदेश दिले आणि आज राज्यभर हा वनवा आंदोलनाच्या रूपातून पेटत आहे.

मायबाप शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसह सामान्यांचे प्रश्न जैसे थे असताना राज्यातील महायुती सरकारच्या मंत्र्यांनी बेताल वक्तव्यसहित भ्रष्टाचाराचा कलंक गाठला आहे. एका बाजूला शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा आकडा वाढत आहे. पीक कर्जाचे नुसते आश्वासन सरकारने दिले. निवडणूक पूर्वी दिलेल्या आश्वासनाचा सत्तेत येताच महायुती सरकारमधील पक्षांना विसर पडला आहे. पीक विम्यापासून शेतकरी वंचित आहे, असे शिवसेना जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत यावेळी म्हणाले.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख गजानन वाघ, जिल्हा सहसंपर्कप्रमुख वसंतराव भोजने, महिला जिल्हाप्रमुख चंदाताई बडे, महिला जिल्हाप्रमुख विजयाताई खडसन, बुलढाणा जिल्हा समन्वयक संदिपदादा शेळके, युवा सेना जिल्हाप्रमुख नंदू कऱ्हाडे, विधानसभा संघटक सुनील घाटे, उपजिल्हाप्रमुख लखन गाडेकर, उपजिल्हाप्रमुख आशिष रहाटे, उपजिल्हाप्रमुख बद्रि बोडखे, उपजिल्हाप्रमुख विलास सुरडकर, उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर , उपजिल्हाप्रमुख तुकाराम काळपांडे, तालुका प्रमुख विजय इतवारे, तालुका प्रमुख विजुभाऊ इंगळे, तालुका प्रमुख किसन धोंडगे, तालुका प्रमुख राजू बुधवत, तालुका प्रमुख निंबाजी पांडव, तालुका प्रमुख श्रीराम खेलदार, तालुका प्रमुख दीपक चांभारे, गजानन बिलोकर, प.स.माजी सभापती सुधाकर आघाव, युवा सेना उपजिल्हाप्रमुख प्रकाश डोंगरे, युवा सेना तालुकाप्रमुख संजय शिंदे,शेख रफिक, अनिकेत गवइ, भीमराव पाटील, शुभम घोंगटे, महिला उपजिल्हाप्रमुख प्रतिक्षा पिंपळे, दिपाली पाटील,व गजानन धांडे यांच्यासह शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# वंदेभारत रेल्वेला शेगांव रेल्वे स्टेशनवर केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी दाखवली हिरवी झेंडी

**बुलढाणा, ११ ऑगस्ट (गुड इव्हिनिंग सिटी) :** संत गजानन महाराजांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी ही वंदे भारत ट्रेन ही महत्वपूर्ण ठरणार आहे या ट्रेनमुळे दोन महानगरे जोडली जाणार असून प्रवाशांच्या वेळेची बचत होऊन होणार आहे जिल्ह्यातील पर्यटनाला चालना मिळेल असा आशावाद केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केला.

नागपुर-पुणे वंदे भारत एक्स्प्रेसला संत नगरी शेगांव मध्ये थांबा मिळवुन देण्याचे काम केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले आहे. आज १० ऑगस्टला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या रेल्वे गाडीला दूरदृश्य प्रणाली द्वारे हिरवी झेंडी दाखविण्यात आली त्यानंतर ही वंदे भारत ट्रेन संतनगरी शेगांव येथे पोचली तेव्हा या वंदे भारत ट्रेनच्या स्वागतासाठी केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव स्वतःह उपस्थित होते. त्यांनी त्यांनी वंदे भारत ट्रेनमधील प्रवाशांशी संवाद साधला व त्यांना प्रवासाच्या शुभेच्छा दिल्या त्यानंतर शेगाव रेल्वे स्थानकावरून वंदे भारत ट्रेनला केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी हिरवी झेंडी दाखवली यावेळी आमदार संजय कुटे रेल्वे स्थानक प्रमुख मोहन देशपांडे यांच्यासह इतर कर्मचारी उपस्थित होते. अत्यंत जलद आणि लोकांना आधुनिक सुख सुविधा देणारी भारतीय



बनावटीची वंदे भारत रेल्वे १० ऑगस्ट पासुन नागपुर ते पुणे दरम्यान धावणार आहे. या वंदे भारत रेल्वेमुळे नागपुर-पुणे हे दोन महानगर दळणवळणासाठी जोडण्याचे काम केंद्र सरकारच्या रेल्वे विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. बुलढाणा लोकसभा मतदार संघातील शेगांवचे संत गजानन महाराज संस्थान संपुर्ण देशामध्ये प्रसिध्द आहे. देशभरातुन लाखो भाविक संत गजानन महाराजांच्या दर्शनासाठी शेगांव नगरीमध्ये येत असतात. पुणे आणि नागपुर हे दोन्ही महानगर हवाई सेवेशी जोडलेले आहे. या महानगरातुन देश-विदेशातुन येणाऱ्या संत गजानन महाराजांच्या भक्तांना प्रवासाची सुविधा उपलब्ध करुन देणारी हि वंदे भारत रेल्वे ठरणारी आहे, अस मत ही केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी यावेळी व्यक्त केले भाविकांच्या आणि मतदार संघातील नागरीकांच्या सुविधेसाठी केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी वंदे भारत ट्रेनला शेगांव येथे थांबा मिळवुन दिल्याने तिचा लाभ भक्तांसोबत जिल्हयातील नागरीकांनाही होणार आहे. वंदे भारत ट्रेन मुळे वेळेची बचत होणार आहे त्या बंद भारत ट्रेनचं स्वागत करण्यासाठी रेल्वे स्थानकावर अनेक जण आले होते त्यांनी गजानन महाराज की जय वंदे मातरम च्या घोषणा देत या ट्रेनचं स्वागत केले.

# आईच्या निधनानंतरही भाऊ उभा राहिला विधवांच्या रक्षाबंधनाला



**बुलढाणा, ११ ऑगस्ट (गुड इव्हिनिंग सिटी) :** जन्मदात्या आईचे निधन ही माणसाच्या आयुष्यातील अतिशय दुःखद घटना. आईचे छत्र हरवले की माणूस जसा काही पोरकाच होऊन जातो. दुःखाचा डोंगर कोसळणे म्हणतात ते अनुभवण्याचा क्षण म्हणजे आईचे निधन. या दुःखाच्या सावटात बहिणीचा आलेला सण अन् त्या सणातही कर्तव्य भावनेने भावाने केलेले रक्षाबंधन चर्चेचा विषय झाले आहे. विधवा महिलांचा हक्काचा भाऊ ठरलेले प्रा. डी एस लहाने यांनी परवा विधवा बहिणी सोबत रक्षाबंधन करून आपल्या दिवंगत मातेला प्रगल्भ सामाजिक जाणीवेची अनोखी आदरांजली अर्पित केली आहे.

शिवशाही परिवाराचे आधारस्तंभ व मानस फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा.डी एस लहाने यांच्या मातोश्री राजकोर बाई लहाने यांचे नुकतेच निधन झाले. हे निधन होऊन कुठेतरी चार-पाच दिवस झाले नाहीत तोच बहिण भावाच्या नात्याचा पवित्र सण रक्षाबंधन येऊन ठेपला. रक्षाबंधनाच्या दिवशी प्रा. लहाने गावात असल्याने परिसरातील विधवांनी राखी घेऊन जात तिथेच रक्षाबंधन केले. दिवसभर शेकडो विधवा बहिणी आपल्या हक्काच्या भावाच्या हातावर राखी बांधून एक प्रकारे त्यांचे दुःख वाटून घेत होत्या. या क्षणाने प्राध्यापक लहाने गहिवरून गेले. विधवा महिलांसाठी विवाह सोहळे, विधवांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी त्यांचे प्रयत्न, शासन दरबारी सुरू असलेला लढा हा सर्व परिचित आहे.

## थोडक्यात

### जुगार अड्ड्यावर पोलीसांचा छापा



**शेगाव, ११ ऑगस्ट (गुड इव्हिनिंग सिटी) :** तालुक्यातील येऊलखेड येथे सार्वजनिक ठिकाणी सुरू असलेल्या जुगार अड्यावर ग्रामीण पोलिसांनी धाड टाकत सात जणांवर कारवाई केली. ही घटना ९ ऑगस्ट रोजी दुपारी तीन वाजता घडली. पोलिस कर्मचारी मुकेश पवार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, येऊलखेड परिसरात जुगारावर छापा टाकण्यात आला. या कारवाईत विशाल वासुदेव हिवराळे (३५), महादेव गोपाळ लांजुळकर (६०), ज्ञानेश्वर त्र्यंबक शिंगोटे (५२), दिलीप किसन खंडारे (४०), प्रकाश विजयसिंग बिसेन (२५), मुरलीधर भिकुजी पुंडकर (रा. येऊलखेड) आणि गजानन गोपाळराव पिसे (रा. दानापूर, ता. तेल्हारा, जि. अकोला) हे जुगार खेळताना आणि खेळविताना आढळून आले. कारवाईदरम्यान आरोपींकडून जुगार साहित्य जप्त करण्यात आले. तपास सुरेंद्रसिंग चव्हाण करीत आहेत.

# तालुका क्रीडा अधिकारी लक्ष्मीशंकर यादव यांचा राज्य शासनाच्यावतीने सन्मान



**बुलढाणा, ११ ऑगस्ट (गुड इव्हिनिंग सिटी) :** शंभर दिवसाची कार्यालयीन सुधारणा विशेष मोहीम ही महाराष्ट्र शासनाकडून राज्य विभाग, जिल्हा व तालुका स्तरावरील एकूण १२ हजार ५०० शासकीय कार्यालयामध्ये यशस्वीपणे राबविण्यात आली.

या मोहिमेमध्ये तालुका क्रीडा अधिकारी या गटातून तालुका क्रीडा अधिकारी मलकापूर या कार्यालयाचा अमरावती विभाग तृतीय क्रमांक निवडण्यात आला आहे. या कार्यालयाने तालुका क्रीडा अधिकारी लक्ष्मीशंकर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका क्रीडा संकुल खामगाव, शेगांव, नांदुरा, मलकापूर येथे उत्कृष्ट सुधारणा कामगिरी केल्याबद्दल त्यांचे व त्यांच्या चमूचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्या वतीने प्रशस्तिपत्र देऊन सन्मान करण्यात आले. सदर प्रमाणपत्र पालकमंत्री मकरंद पाटील यांचे हस्ते प्रदान देण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील सह अन्य मान्यवर उपस्थित होते. तालुका क्रीडा संकुल खामगाव, शेगांव, नांदुरा, मलकापूर येथे संकुल सुधारणा मध्ये कार्य केले तसेच मागील २० वर्ष पासून तालुका क्रीडा संकुल शेगांव येथील संकुल जागे वरचे १९२ अवैध अतिक्रमण धारक यांना हटविणे साठी त्यांना विशेष कामगिरी केली आहे, धाडसी निर्णय,व उत्कृष्ट प्रशासक म्हणून त्यांची ओळख आहे.

# बसस्थानक परिसरात चोरी; गुन्हा दाखल

**देऊळगाव राजा, ११ ऑगस्ट (गुड इव्हिनिंग सिटी) :** येथील बसस्थानक परिसरात, चौंडेश्वरी भोजनालयाच्या बाजूला उभी असलेल्या कारमधून भरदिवसा अज्ञात व्यक्तीने पैशांची बॅग आणि दोन मोबाइल चोरी केल्याची घटना ९ ऑगस्ट रोजी दुपारी सुमारे १२ वाजता घडली.

प्राप्त माहितीनुसार, डॉ. विठ्ठल श्रीकृष्ण देशमुख यांनी त्यांची कार (क्रमांक एमएच-२८-बीक्यू-३३०३) त्यांच्या श्रीकृष्ण बाल रुग्णालयासमोर रस्त्याच्या कडेला उभी करून ते दवाखान्यात गेले होते. काही वेळानंतर बाहेर आल्यावर त्यांनी पाहिले असता, ड्रायव्हर सीटजवळील आसनावर ठेवलेली निळ्या रंगाची बॅग गायब असल्याचे लक्षात आले.

या बॅगेत रोख रक्कम ७,००० रुपये, दोन मोबाइल (किंमत सुमारे २२,००० रुपये) आणि इतर साहित्य असे मिळून अंदाजे २९,००० रुपयांचा मुद्देमाल होता. अज्ञात चोरट्याने ही बॅग घेऊन पोबारा केला. घटनेची नोंद देऊळगाव राजा पोलिस ठाण्यात करण्यात आली असून, पोलिसांनी गुन्हा दाखल केला. अलीकडे चोरींच्या घटनात वाढ झाल्याचे दिसून येत आहे. पोलीसांनी यावर कठोर कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

# श्री शिवाजी महाविद्यालयात इको-फ्रेंडली राखी स्पर्धा संपन्न

**मोताळा, ११ ऑगस्ट (गुड इव्हिनिंग सिटी) :** श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित श्री शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मोताळा येथे ११ ऑगस्ट रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गजानन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली वनस्पतीशास्त्र विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागअंतर्गत महाविद्यालयात इको-फ्रेंडली राखी स्पर्धा संपन्न झाली.

या स्पर्धेत, विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे पर्यावरणपूरक साहित्य वापरून आकर्षक आणि नाविन्यपूर्ण राख्या तयार केल्या. या स्पर्धेत प्रथम क्रमांक कु. आचल किरोचे द्वितीय क्रमांक आचल ढाके व तृतीय क्रमांक मिताली मोहिते यांना मिळाला. स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके देऊन गौरवण्यात आले. या स्पर्धेमुळे, पर्यावरणपूरक जीवनशैली जगण्याची प्रेरणा मिळाली आणि लोकांना पर्यावरणाचे महत्व पटले,असे मत वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ प्रविण ठेंग यांनी व्यक्त केले. ावेळी महाविद्यालयातील वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. सुनील मामलकर, आयक्यूएसी समन्वयक डॉ.प्रतीक गायकी, प्रा. दिनेश ढगे, प्रा.अविनाश मेहेरकर, प्रा. पुरुषोत्तम चाटे, प्रा. डॉ. अभय ठाकूर, प्रा. डॉ. अरुण गवारे, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सुप्रिया बेहेरे, प्रा. भास्कर भिसे,प्रा. नागेश गट्टुवार, प्रा. कल्पेश उदयकार यांची उपस्थिती होती.


# नगर परीषद कार्यालय, बुलडाणा

Email : mcbuldana@gmail.com दुरध्वनी क्र. ०७२६२-२४२३१८

जा.क्र. /आवि/नपाबु/४८४३/२०२५ दि. ११/०८/२०२५

## जाहीर सुचना

बुलडाणा नगर परिषद हद्दीतील सर्व मास विक्रेते यांना कळविण्यात येते की, दि.१५/०८/२०२५ रोजी श्रीकृष्ण जन्माष्टमी व दि.१६/०८/२०२५ रोजी दहिहंडी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार आहे. मा. पोलीस अधिक्षक बुलडाणा यांच्याकडुन प्राप्त पत्राप्रमाणे दि. १५/०८/२०२५ व दि.१६/०८/२०२५ रोजी बुलडाणा शहरात कोठेही उघड्यावर मांस विक्री करु नये याबाबत सुचना मिळालेली आहे. सदर सुचनेनुसार बुलडाणा शहर हद्दीमध्ये कोणत्याही व्यक्तीने/नागरीकांने उघड्यावर मांस विक्री करु नये. मांस विक्री करतांनाचे निदर्शनास आल्यास नगर परिषद अधिनियम १९६५ च्या तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येवुन वेळप्रसंगी संबंधीतांवर फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

मुख्याधिकारी
नगर परिषद बुलडाणा


# हुमणी अळीपासून पिकांचे रक्षण हीच भरघोस उत्पादनाची हमी

राज्यासह नागपूर विभागात समाधानकारक पाऊस झाला व पेरणीही पूर्णपणे झालेली आहे. शेतात पीक डौलाने उभी राहत असून त्यांची वाढ व निकोपतेसाठी शेतकऱ्यांना कसोशीने लक्ष द्यावे लागणार आहे. ऑगस्ट महिन्यामध्ये पिकांच्या वाढीबरोबरच कीड व अळीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठीच्या शेतकऱ्यांना नियोजनही करावे लागणार आहे. कापूस पिकावर होणारा फुलकीडे व गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव तसेच सोयाबीन, तूर व कापूस पिकांवर दिसून येणाऱ्या हुमणी अळीच्या धोक्यापासून रक्षण करण्यासाठी कृषी विभागाने दिलेल्या सल्ल्यावर आधारित हा विशेष लेख.

कापूस पिकावर जुलै महिन्याच्या दूसऱ्या आठवड्यापासून आढळून येणाऱ्या तूडतुड्यांचा व याच महिन्यात शेवटच्या आठवड्यापासून तसेच ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून सुरू होणारा फुलकीड्यांचा प्रादूर्भाव व गुलाबी बोंड अळीच्या प्रादूर्भावापासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी कृषी विभागाने एकीकृत व्यवस्थापनांतर्गत रस शोषक किडींचे व गुलाबी बोंड अळीच्या व्यवस्थापनाबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले आहे. तसेच सोयाबीन, कापूस, तूर पिकांचे बहुभक्षीय हुमणी अळीपासून (होलोट्रीचीया प्रजाती) नुकसान टाळण्यासाठी कृषी विभागाकडून किड व्यवस्थापनाचा सल्ला देण्यात आला आहे. कापूस पिकावर सुरवातीच्या काळात प्रामुख्याने मावा, तुडतुडे आणि फुलकीडे या रसशोषक किडीचा प्रादूर्भाव आढळून येतो. कोरडवाहू कापूस पिकावर मावा किडीचा प्रादूर्भाव जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून आढळून येतो तर तूडतुड्यांचा प्रादूर्भाव जुलैच्या शेवटच्या आठवड्यापासून व फुलकीड्यांचा ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यापासून आढळून येतो. गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव डोमकळ्याच्या स्वरूपात ऑगस्ट महिन्यात दिसून येतो. तसेच हुमणी अळी (होलोट्रीचीया प्रजाती) ही एक बहुभक्षी किड असून महाराष्ट्रामध्ये होलोट्रीचीया सेरेंटा या प्रजातीमुळे प्रामुख्याने सोयाबीन, कापूस, तूर या पिकांचे नुकसान होते. या सर्व प्रकारच्या किडींच्या व्यवस्थापनासाठी शेतकऱ्यांनी उपाययोजना करणे गरजेचे आहे. एकात्मिक व्यवस्थापनांतर्गत कपाशीवरील रस शोषक कीडींच्या व्यवस्थापनासाठी विशेषत: बीटी कपाशीला किटकनाशकांची फवारणी करू नये. वेळोवेळी प्रादूर्भावग्रस्त फांद्या, पाने व इतर पालापाचोळा जमा करून किडींसहीत नष्ट करावा. कपाशीवरील किडींच्या नैसर्गिक शत्रू किटकांचे पोषण करण्यासाठी चवळीचे आंतर पीक घ्यावे. वेळेवर आंतरमशागत करून पीक तणविरहीत ठेवावे. मृद परीक्षणाच्या आधारावर खतमात्रेचा अवलंब करावा आणि जास्तीचा नत्र खताचा वापर टाळावा. तसेच मावा, तुडतुडे आणि फुलकिडे यांची एकत्रित सरासरी संख्या जास्त आढळून आल्यास नियंत्रणासाठी रासायनिक किटकनाशकांचा वापर करावा. त्यासाठी बुप्रोफेझीन २५ टक्के प्रवाही २० मि.ली. किंवा फिप्रोनील ५ टक्के प्रवाही ३० मि.ली. किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के २.५ मि.ली. यापैकी कोणत्याही एका किटकनाशकाची १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. कपाशीवरील गुलाबी बोंड अळीच्या व्यवस्थापनासाठी उगवणीनंतर ४० ते ४५ दिवसांनतर फेरोमेन (कामगंध) सापळे वापरावे. एकरी दोन किंवा हेक्टरी पाच फेरोमेन (कामगंध) सापळे लावावेत. सतत तीन दिवस या सापळ्यामधे आठ ते दहा पतंग आढळल्यास गुलाबी बोंड अळीच्या व्यवस्थापनाचे उपाय योजावेत तसेच मास ट्रॅपिंग करिता हेक्टरी १५ ते २० कामगंध सापळे लावावेत. पिकातील डोमकळ्या नियमित शोधून त्या अळी सहीत नष्ट कराव्यात. पीक उगवणीनंतर ३५ ते ४० दिवसांपासून दर १५ दिवसांनी ५ टक्के निंबोळी अर्काची किंवा अॅझॅडिरेक्टिन ३०० पीपीएम ५० मिली प्रति १० लीटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी. गुलाबी बोंड अळीच्या प्रादुर्भावाची टक्केवारी ५ टक्के पेक्षा जास्त आढळल्यास क्विनॉलफॉस २५ टक्के मिली किंवा क्लोरपायरीफॉस २० टक्के प्रवाही २५ मिली किंवा प्रोफेफॉस ५० टक्के ३० मिली किंवा इंडोक्साकार्व १५.८ टक्के १० मिली किंवा डेल्टामेथ्रीन २.८ टक्के १० मिली या पैकी कोणतेही एक किटकनाशक प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

### हुमणी अळीच्या प्रादुर्भावापासून रक्षण

सोयाबीन, कापूस, तूर पीकांचे बहुभक्षीय हुमणी अळीपासून (होलोट्रीचीया प्रजाती) नुकसान टाळण्यासाठी सातत्याने ही किड येणाऱ्या भागात बाभुळ, कडूलिंब आणि बोर यासारख्या झाडांवर किटकनाशकाची पहिली फवारणी करावी. किटकनाशकांचा वापर करतांना मजुरांना संरक्षण साधने पुरवावीत. गरज भासल्यास दुसरी फवारणी पहिल्या फवारणीनंतर ३ आठवड्यांनी करावी. हुमणी अळी पाऊस पडल्यानंतर जमिनीत अंडी देते. ज्वारी, बाजरी, मका, भात, गहु, ऊस, मिरची, मूग, करडई, वांगी, कापूस आणि सुर्यफूल आदी पिकांची मुळे ही अळी फस्त करते. याकारणाने पिके उन्मळून जमिनीवर कोलमडून पडतात. या किडीचा सौम्य प्रादुर्भाव तुरळक ठिकाणीच असल्यास जैविक मित्र बुरशी मेटॅरायझियम ४ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून पिकाच्या मुळाशी आळवणी करावी किंवा मेटॅरायझियम १ किलो प्रति १०० किलो शेणखतात मिसळून प्रति हेक्टरी शेतात फेकावे. मित्र बुरशीचा वापर करतांना ओलावा असणे आवश्यक असते.

लक्षणीय प्रादुर्भाव असल्यास व्यवस्थापनाकरिता फिप्रोनील ४० टक्के इमिडॅक्लोप्रिड ४० टक्के दानेदार ५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात घेऊन द्रावण खोडांजवळ टाकावे किंवा कार्बोफ्यूरॉन ३ टक्के दानेदार ३३.३० किलो किंवा थायोमेथोक्झाम ०.४ टक्के बायफेनथ्रिन ०.८ टक्के दानेदार १२ किलो प्रति हेक्टर किंवा थायोमेथोक्झाम ०.९ टक्के फिप्रोनिल २ टक्के दानेदार १२ ते १५ किलो प्रति हेक्टर खोडांजवळ जमिनीत ओलावा असतांना मातीत मिसळून द्यावे, असा मोलाचा सल्ला कृषी विभागाने दिला आहे.



# अनोळखी, खोटे व्हॉट्सॲप कॉल आणि SMS करणाऱ्यांना असे पाठवा तुरुंगात!

**दूरसंचार विभागाने चक्षू पोर्टल सुरू केले आहे, ज्याद्वारे कोणीही ऑनलाइन बनावट कॉल आणि संदेशांबद्दल तक्रार करू शकतो. आजकाल फसवे व्हॉट्सॲप मेसेज आणि कॉल्समध्ये वाढ होत आहे, त्याविरोधात सरकारी पोर्टलवर ऑनलाइन तक्रार दाखल करून फसवणूक करणाऱ्यांना तुरुंगात पाठवले जाऊ शकते.**

## चक्षू पोर्टल म्हणजे काय?

चक्षू पोर्टल हे सायबर फसवणुकीला आळा घालण्यासाठी दूरसंचार विभागाचा (DoT) एक नवीन उपक्रम आहे. हे पोर्टल ग्राहक सेवा हेल्पलाइनच्या नावावर होणारी फसवणूक, बँक खात्याची बनावट पडताळणी, पेमेंट वॉलेट, गॅस कनेक्शन इत्यादी सायबर गुन्ह्यांना प्रतिबंध करते. चक्षू पोर्टलवर कॉल, एसएमएसद्वारे होणाऱ्या फसवणुकीची तक्रार करता येते.

- तक्रार कशी नोंदवायची? : sancharsathi.gov.in या वेबसाईटला भेट द्या आणि Citizen Centric Services वर खाली स्क्रोल करा. खाली दिलेला आय पर्याय निवडा आणि नंतर रिपोर्टिंगवर क्लिक करा. ड्रॉप-डाउन मेनूमधून फसवणूक श्रेणी निवडा आणि कॉलचा स्क्रीनशॉट संलग्न करा. तुम्हाला ज्या मोबाईल नंबरवरून फसवणूक कॉल संदेश प्राप्त झाला तो नंबर प्रविष्ट करा. फसवणूक कॉलची तारीख आणि वेळ प्रविष्ट करा आणि त्याची तक्रार करा. तुमचे वैयक्तिक तपशील प्रविष्ट करा. OTP द्वारे त्याची पडताळणी करा आणि तक्रार सबमिट करा.
- फसव्या WhatsApp संदेशांची तक्रार कशी करावी? : चक्षू मेनूमध्ये मध्यम WhatsApp मोड निवडा. ड्रॉप-डाउन मेनूमधून फसवणूक श्रेणी निवडा आणि तुम्हाला प्राप्त झालेल्या संदेशाचा स्क्रीनशॉट संलग्न करा. संशयास्पद WhatsApp संप्रेषण पर्याय निवडा. यानंतर फसवणूक संदेश आणि कॉल असलेला मोबाइल नंबर प्रविष्ट करा. फसवणूक कॉलची तारीख आणि वेळ प्रदान करा आणि अहवाल दाखल करा. तुमची वैयक्तिक माहिती प्रविष्ट करा. यानंतर OTP सत्यापित करा.

गुड इव्हिनिंग City

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

# कुठेही असा; संगणक, लॅपटॉप तिथून हाताळा!

**घरच्या अथवा कार्यालयातील संगणकामधील एखादी फाइल आपल्याला अचानक हवी असते. पण त्यावेळेस आपण संगणकाच्या जवळ नसतो. कामानिमित्त बाहेर असतो. जी फाइल हवी ती नेमकी आपल्या मेलमध्ये नसते. अशा वेळी काय करायचे हे आपल्याला सुचत नाही. मग काय करायचे, असा प्रश्न निर्माण होतो. पण तंत्रज्ञानाने यावरही उत्तर काढलेले आहे. आपल्या घरचा अथवा कार्यालयातील संगणक आपण थेट आपल्या हातातील स्मार्टफोन अथवा टॅबशी जोडून संगणकाचा ताबा मिळवू शकतो. हे करण्यासाठी अनेक पर्याय उपलब्ध आहेत. यातील काही पर्याय पाहू या...**

## क्रोम रीमोट डेस्कटॉप

एखादा पत्ता... बातमी... माहिती... छायाचित्र... आदीचा शोध घ्यायचा झाला तर पटकन गुगलवरच हात जातो. आपल्या घरातील संगणक आपल्या मोबाइलमधून वापरण्याचा पर्यायही गुगलने उपलब्ध करून दिला आहे. सहजता ही गुगलची खासियत असल्यामुळे ही सुविधाही अगदी सोप्या स्वरूपात उपलब्ध करून दिली आहे. विंडोज, मॅक आणि लिनक्स ही ऑपरेटिंग प्रणाली असलेले संगणक अँड्रॉइड आणि आयओएसवर उपलब्ध करून देण्यासाठी गुगल रीमोट डेस्कटॉप ही सुविधा उपयुक्त ठरते. क्रोम रीमोट कसे वापरायचे? जाणून घेऊया. सर्वप्रथम तुमच्या मोबाइल ब्राऊजरमध्ये क्रोम रीमोट डेस्कटॉप एक्स्टेंशन डाउनलोड करून घ्या. हे क्रोमच्या वेब स्टोअरमध्ये उपलब्ध आहे. डाउनलोड झाल्यानंतर अवघ्या काही सेकंदांत ते इंस्टॉल होते. हे करण्यासाठी क्रोमचे लॉगइन असणे आवश्यक आहे. एकदा का तुम्ही हे इंस्टॉल केले की तुमच्या बुकमार्कमध्ये क्रोम रीमोट डेस्कटॉपची लिंक ॲड होते. ज्यावेळेस तुम्ही पहिल्यांदा रीमोट ॲक्सेस घेता त्यावेळेस तुम्हाला एक छोटीशी युटिलिटी डाउनलोड करावी लागते. ही युटिलिटी एका मिनिटापेक्षा कमी अवधीत डाउनलोड होते. यासाठी क्रोम तुम्हाला मदत करते. त्याप्रमाणे करत गेल्यास ती युटिलिटी डाउनलोड आणि इंस्टॉल होते. युटिलिटी इंस्टॉल झाल्यानंतर क्रोम रीमोट डेस्कटॉप तुम्हाला एक पिन देण्यास सांगतो. तुम्हाला पाहिजे तो पिन देऊन तुम्ही तुमचा रीमोट ॲक्सेस सुरक्षित करत असता. एकदा का तुम्ही पिन टाकला की काही वेळातच तुमचा संगणक रीमोट ॲक्सेसच्या यादीत येतो. म्हणजे तुमच्या मोबाइलमध्ये माय लॅपटॉप आणि माय डेस्कटॉप असा पर्याय येतो. हे झाल्यावर तुमच्या संगणकावर तुम्ही क्रोमचे रीमोट डेस्कटॉप एक्स्टेंशन डाउनलोड करून घ्या. त्यानंतर ते तुम्ही सुरू केल्यावर तुम्हाला तुमच्या संगणकाची यादी दिसेल. त्यातील पर्याय निवडला की तो मोबाइलशी जोडला जाईल. ही जोडणी करत असताना तुम्हाला पिन विचारला जाईल. मोबाइल ॲपमध्ये दिलेला पिन इथे दिला की तुमची जोडणी पूर्ण होते. पिन दिल्यावर तुम्हाला हा पिन सेव्ह करायचा आहे का? असे विचारले जाते. मात्र तसे करू नका. जोडणी पूर्ण झाले की तुमच्या फोनमध्ये डेस्कटाप दिसू लागतो.

## वापरा टीम व्ह्यूअर

सर्वांकडेच क्रोम ब्राऊजर असतेच असे नाही. अनेक कार्यालयांत फायरफॉक्स वापरले जाते. यामुळे तुम्ही क्रोम रीमोट डेस्कटॉप वापरू शकत नाहीत. यामुळे तुम्ही टीम व्ह्यूवर या ॲपचा वापर करू शकता. क्रोम रीमोट डेस्कटॉपप्रमाणे तुम्ही विंडोज, मॅक, अँड्रॉइड, आयओएस, लिनक्स यासाठी हे ॲप वापरू शकतो.



याचबरोबर इतरही ऑपरेटिंग प्रणालीसाठी याचा वापर होतो. मात्र हे वापरणे क्रोम रीमोट डेस्कटॉपपेक्षा थोडे अवघड आहे. सर्वप्रथम तुम्ही संगणकावर टीम व्ह्यूअर संकेतस्थळाला भेट द्या व तेथून टीम व्ह्यूअरची अद्ययावत आवृत्ती डाउनलोड करून घ्या. हे इंस्टॉल होत असताना तुम्ही याचा वापर कशासाठी करणार हे सांगावे लागते. म्हणजे वैयक्तिक उपयोगासाठी असेल तर हे सॉफ्टवेअर मोफत वापरता येते. नाहीतर काही पैसे भरावे लागतात. तुम्ही पर्याय निवडला की काही मिनिटांत इंस्टॉलेशन प्रक्रिया पूर्ण होते. पहिली पायरी पूर्ण झाली की तुम्हाला एक आयडी आणि पिन दिला जाईल. म्हणजे ज्यावेळेस तुम्हाला रिमोट ॲक्सेस हवा आहे त्यावेळेस तुम्हाला आयडी आणि पिन द्यावा लागतो. तेव्हाच तुम्हाला मोबाइलवर ॲक्सेस मिळू शकतो. सुरक्षेच्या दृष्टीने हे योग्य असले तरी ज्यावेळेस आपल्याला ॲक्सेस हवा असेल तेव्हा एखाद्या व्यक्तीला आपल्या संगणकावर लॉगइन करणे आवश्यक असते. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यावर तुमचा संगणक टीम व्ह्यूअरच्या सर्व्हरवर पोहोचतो. यानंतर संगणकाचा वापर मोबाइलवर करण्यासाठी तुम्हाला मोबाइलमध्ये टीमव्ह्यूअरचे ॲप डाउनलोड करावे लागेल. यानंतर तेथे असलेला कॉम्प्युटर्स हा पर्याय निवडा. यानंतर तुमच्या लॉगइन आयडीने लॉगइन करा. लॉगइन झाल्यानंतर माय कॉम्प्युटर्स हा पर्याय तुमच्यासमोर येईल. यानंतर तुम्ही तुमच्या संगणकाचा ॲक्सेस मिळवू शकतो. हे लॉगइन करून संगणक सुरू झाल्यावर तुम्ही संगणक वापरत असताना ज्या काही शॉर्टकीजचा वापर करता त्याचा वापर यात करू शकता. ही या सॉफ्टवेअरची जमेची बाजू म्हणता येईल.

## गुगलच करणार वर्गीकरण

तुमच्या फोटोचा प्रकार, त्यातील व्यक्ती-ठिकाणे यांचा विचार करून गुगल फोटो त्यांचे स्वतःहून वर्गीकरण करणार आहे. त्यामुळे तुमच्या घराचे फोटो, मुलांचे फोटो, तुमच्या पाळीव प्राण्यांचे फोटो असे वर्गीकरण तुम्ही करण्याची गरज राहणार नाही. हे फोटो सर्च करणेही सोपे असून फोटोतील तुमच्या लक्षात असलेली गोष्ट सांगून तुम्ही सर्च केले की लगेच तशा प्रकारचे फोटो तुमच्यासमोर हजर होतील. यामध्ये फोटो एडिटिंगचीही सुविधा देण्यात आली असून त्यात फोटोचे बेसिक एडिटिंग करता येते. फोटो नेमका कसा आणि कुठे एडिट करायचे हे जर तुम्हाला माहिती नसेल तर त्यात ऑटो फिक्सचा पर्याय देण्यात आला असून याद्वारे तुमचा फोटो गुगलच एडिट करून अधिक चांगला कसा दिसेल, याचा प्रयत्न करते. यात कोलाज, पॅनोरमा, ॲनिमेटेड फाइल तयार करण्याचाही पर्याय आहे. गुगल फोटोमध्ये सेव्ह केलेले व्हिडीओ-फोटो तुम्ही ट्विटर, व्हॉट्स ॲप, फेसबुक वगैरे कुठल्याही ठिकाणी शेअर करू शकाल. त्यासाठी आवश्यक लिंक तयार करण्याचा पर्याय यात देण्यात आला आहे. त्यामुळे गुगल फोटो नसलेल्या व्यक्तीही याठिकाणी सेव्ह केलेले फोटो पाहू शकतील किंवा डाऊनलोड करू शकतील.

# आधारशी लिंक केलेला मोबाईल नंबर चुकीचा?

**आधार कार्ड हे एक महत्त्वाचे दस्तऐवज आहे, जे सर्वत्र वापरले जाते. तुम्ही नवीन नोकरी किंवा शाळा किंवा महाविद्यालयात प्रवेश घ्या किंवा रेल्वे, विमान तिकीट यांसह कोणतेही सरकारी किंवा खासगी काम करायचे असेल तर आधार कार्ड आवश्यक झाले आहे. मात्र, जर तुमचे सिम कार्ड तुमच्या आधारशी चुकीच्या पद्धतीने लिंक झाले असेल तर तुम्हाला तुरुंगात जावे लागू शकते. अशा परिस्थितीत आजच तुमच्या आधार कार्डवर चुकीचा सिम कार्ड क्रमांक नोंदवला आहे का ते तपासा. जर तुमच्या आधारशी बनावट सिम कार्ड लिंक असेल किंवा तुम्ही तुमच्या आधारकार्डसोबत जोडलेले सीम इतर कोणाला दिले असेल तर ते ताबडतोब परत घ्या. अन्यथा तुम्हाला नुकसान सहन करावे लागू शकते... त्या कार्डवरून काही गुन्हेगारी कृत्य घडल्यास त्याचे धागेदोरे तुमच्यापर्यंत येऊ शकतात... त्या परिस्थितीत तुम्हाला स्वतःची सोडवणूक कठीण जाणार आहे...**

## कोणते सिम कार्ड तुमच्या आधारशी जोडलेले आहे? कसे ओळखायचे...

तुमच्या आधार कार्डशी कोणते सिम कार्ड लिंक आहे? हे जाणून घेणे खूप सोपे आहे, जे घरबसल्या ऑनलाइन कळू शकते. सर्वप्रथम तुम्हाला आधारच्या अधिकृत वेबसाइटवर जावे लागेल, म्हणजे UIDAI. त्यानंतर तुम्हाला वरच्या डाव्या कोपऱ्यात My Aadhaar हा पर्याय दिसेल, ज्यावर तुम्हाला क्लिक करावे लागेल. तुम्ही मोबाइलवर आधारची वेबसाइट उघडल्यास, तुम्हाला वरच्या डाव्या कोपऱ्यात तीन ओळी दिसतील, त्यावर क्लिक केल्यावर My Aadhaar पर्याय दिसेल, ज्यावर क्लिक करावे लागेल. त्यानंतर तुम्हाला तळाशी स्क्रोल करावे लागेल, जिथे तुम्हाला आधार सेवा पर्यायावर क्लिक करावे लागेल. यानंतर तुम्हाला Verify ईमेल/मोबाइल नंबरवर टॅप करावे लागेल. त्यानंतर तुम्हाला एक नवीन पेज उघडेल, जिथे तुम्हाला दोन पर्याय दिसतील. यामधून तुम्हाला मोबाईल नंबर चेक करण्याच्या पर्यायावर टॅप करावे लागेल. यानंतर तुम्हाला आधार कार्डचे 12 अंक टाकावे लागतील. त्यानंतर तुम्हाला तुमचा मोबाईल नंबर टाकावा लागेल. यानंतर तुम्हाला कॅप्चा कोड टाकावा लागेल. जर तुमचा मोबाईल नंबर तुमच्या आधारशी लिंक असेल तर तुम्हाला रेकॉर्ड जुळत असल्याची सूचना मिळेल. त्याचप्रमाणे, जर तुमच्या आधारशी इतर कोणताही मोबाइल नंबर लिंक असेल, तर तुम्हाला रेकॉर्ड जुळत नसल्याची सूचना मिळेल.

गुड इव्हिनिंग City

# चंदेरी

## आमिरने ४ आलिशान फ्लॅट्स दिले भाड्याने!

बॉलीवूड अभिनेता आमिर खान कुठल्या न कुठल्या कारणाने प्रेक्षकांमध्ये चर्चेचा विषय ठरत असतो. अशातच आता तो सध्या चर्चेत आलाय ते त्याने भाड्याने दिलेल्या त्याच्या फ्लॅट्समुळे. अभिनेत्याचे मुंबईत अनेक फ्लॅट्स असून, त्यासाठी त्याने आकारलेल्या भाड्याची रक्कमही बरीच मोठी आहे. आमिर खानचे मुंबईतील वांद्रे परिसरात विरगो सोसायटीमध्ये अनेक फ्लॅट्स आहेत. सध्या त्या इमारतीचे काम सुरू असल्याने अभिनेता दुसरीकडे राहत आहे. तो राहत असलेल्या इमारतीचे नूतनीकरण करून तिथे आलिशान फ्लॅट्स बांधण्याचं डेव्हलपरचं नियोजन असल्याचे म्हटले जात आहे. अहवालानुसार या इमारतीत आमिर खानचे तब्बल १२ फ्लॅट्स आहेत. आमिर खान सध्या राहतो त्याच परिसरात शाहरुख खानचेही घर आहे. त्याच्या मन्नत या आलिशान बंगल्याचे काम सुरू असल्याने तो सध्या वांद्रे येथील पूजा कासा इमारतीत राहत आहे. आमिर खानने वांद्रे येथील त्याचे ४ आलिशान अपार्टमेंट्स भाड्याने दिले असून, दर महिन्याला तो त्या भाड्यांतून २४.५ लाख इतकी रक्कम मिळवत आहे.

# स्मृती इराणी सर्वाधिक मानधन घेणाऱ्या अभिनेत्री

## दीपिका पादुकोणलाही टाकलं मागे

**एकेकाळी 'क्योंकि सास भी कभी बहू थी' ही मालिका प्रचंड गाजली होती. यातील सर्वच कलाकारांनी प्रेक्षकांच्या मनात स्थान निर्माण केलं आहे आणि ते अजूनही कायम आहे. अशातच आता या हिट मालिकेचा दुसरा भागही प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. या मालिकेनिमित्त 'तुलसी' फेम अभिनेत्री स्मृती इराणी यांनी छोट्या पडद्यावर दमदार पुनरागमन केलं आहे.**



गेल्या काही वर्षांत स्मृती इराणी राजकारणात सक्रिय होत्या. त्यामुळे त्यांनी कलाक्षेत्रातून काही काळ ब्रेक घेतला होता. मात्र, सध्या स्मृती इराणी तुलसी विराणीच्या भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला आल्या आहेत. त्यांच्या 'क्योंकि सास भी कभी बहू थी २' या मालिकेने अवघ्या काही दिवसांतच रेकॉर्ड मोडले आहेत, त्याचबरोबर स्मृती इराणी यांनीसुद्धा कमाईबाबत मोठा विक्रम केला आहे. त्या टीव्ही इंडस्ट्रीतील सर्वाधिक मानधन घेणाऱ्या अभिनेत्री ठरल्या आहेत. स्मृती इराणी प्रत्येक एपिसोडसाठी तब्बल १४ लाख रुपये घेत आहेत. यामुळे त्यांनी 'अनुपमा' मालिकेच्या प्रत्येक एपिसोडसाठी ३ लाख रुपये घेणाऱ्या रुपाली गांगुली, तसंच दोन लाखांपर्यंत मानधन घेणाऱ्या हिना खान यांनाही मागे टाकलं आहे. याबाबत स्मृती इराणी म्हणाल्या, जो व्यक्ती सातत्याने चांगली कामगिरी करतो, ज्यामुळे त्या मालिकेची टीआरपी वाढते, त्याला योग्य मोबदला मिळायलाच हवा. माझं मानधन हे अशा प्रकारच्या व्यावसायिक दृष्टिकोनाचं उदाहरण आहे आणि हे सगळं सहजासहजी मिळालेलं नाही, यामागे खूप मेहनत आहे. 'क्योंकि सास भी कभी बहू थी २'चे १५० एपिसोड प्रसारित होणार आहेत. त्यामुळे या मालिकेमधून स्मृती इराणी तब्बल २१ कोटी रुपये कमावणार आहेत. यामुळे मानधनाबाबत त्यांनी बॉलीवूड अभिनेत्री दीपिका पदुकोणलाही मागे टाकलं आहे. शाहरुख खानबरोबरच्या 'पठान' चित्रपटासाठी दीपिकाला एकूण १५ कोटी रुपये मानधन मिळालं होतं. नव्या भागामध्ये स्मृती इराणी आणि अमर उपाध्याय मुख्य भूमिकेत असून, त्यांच्यासह हितेन तेजवानी, गौरी प्रधान, रोहित सुचांती, शगुन शर्मा, अमन गांधी, तनिषा मेहता, अंकित भाटिया आणि प्राची सिंग यांच्याही महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. सध्या मालिकेला प्रेक्षक चांगलाच प्रतिसाद देत आहेत. जुन्या पिढीसह आजच्या पिढीमधील प्रेक्षकांनासुद्धा ही मालिका आवडत आहे.

# अजय-काजोलचा गोव्यात आलिशान व्हिला, एका रात्रीचं भाडं ७५ हजार रुपये

**चित्रपटांमध्ये अभिनय करण्याव्यतिरिक्त, काही कलाकार व्यवसाय करण्यासाठीदेखील प्रसिद्ध आहेत. त्यांचे खूप मोठे व्यवसाय आहेत. बॉलीवूडचे कपल अजय देवगण आणि काजोल हे हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्वात लोकप्रिय चेहऱ्यांपैकी एक आहेत. हे जोडपे मुंबईत शिवशक्ती नावाच्या त्यांच्या बंगल्यात राहतात. ज्याची किंमत ६० कोटी रुपये आहे. गेल्या अनेक वर्षांपासून चित्रपटांमध्ये काम करणाऱ्या या जोडप्याने बरीच संपत्ती जमवली आहे.**





या जोडप्याचे लंडनमध्येदेखील एक आलिशान घर आहे. उत्तर गोव्यात त्यांचा एक आलिशान व्हिला आहे, ज्याला त्यांनी व्हिला एटरना असे नाव दिले आहे. काजोल आणि अजय गोव्यात त्यांच्या सुट्टीत जातात. या जोडप्याने ही मालमत्ता गेस्टसाठीदेखील खुली केली आहे. व्हिला एटरना अतिशय आलिशान पद्धतीने सजवलेला आहे. हा व्हिला उत्तर गोव्यातील मोइरा गावाजवळ आहे. हा व्हिला पोर्तुगीज स्टाईलमध्ये बांधला गेला आहे आणि त्यात सर्व मॉडर्न सुविधा आहेत. तुम्ही व्हिलामध्ये प्रवेश करताच, तुमचे स्वागत प्रथम एका मोठ्या स्विमिंग पूलद्वारे केले जाते. हे घर स्विमिंग पूलभोवती बांधलेले आहे. व्हिला हिरव्यागार झाडांनी वेढलेला आहे आणि रहिवाशांना एकांतदेखील मिळतो. स्विमिंग पूलजवळ एक लॉन आहे जो हिरवळीने भरलेला आहे, त्यात एक बागदेखील आहे. लॉनच्या शेजारी, घरामध्ये शंभर वर्षे जुनी विहीरदेखील आहे. व्हिलामध्ये पाच बेडरूम आहेत आणि प्रत्येक खोली वेगळ्या स्टाईलमध्ये बांधलेली आहे. सर्व खोल्या आरामदायी आणि सुंदर आहेत आणि लाकडी बेड आणि सोफे आहेत. प्रत्येक खोलीतून हिरव्यागार लॉन आणि स्विमिंग पूलचे सुंदर दृश्य दिसते. या व्हिलामध्ये एक मोठा डायनिंग एरियादेखील आहे. हा व्हिला जितका मोठा दिसतो तितकाच तो सुंदर आणि सुसज्ज आहे. हा व्हिला बाहेरून जितका सुंदर दिसतो तितकाच तो आतूनही सुंदर आहे. यात एक मोठा वॉटर वॉल फाउंटन आहे, जो समुद्रकिनाऱ्यासारखा अनुभव देतो आणि पाण्याचा आवाज त्याला शांत वातावरण देतो. तर एटरनाचे एका रात्रीचे भाडे सुमारे ७५,००० हजार रुपये आहे.

**अभिनय क्षेत्रात कलेसह सौंदर्याला, दिसण्यालाही महत्त्व असतं. अभिनेत्रींच्या बाबतीत तर बऱ्याचदा त्यांना त्यांच्या दिसण्यावरून कामं दिली जातात, असं म्हटलं जातं. लोकप्रिय अभिनेत्री मानसी पारेख हिने याबद्दलचा तिचा अनुभव सांगितला आहे. तिला लग्न केलं तर काम मिळणार नाही, असंही सांगण्यात आलं होतं. ती हिंदी व गुजराती चित्रपटात काम करते.**


# मानसी पारेखला निर्मात्यानं लग्नाची घातली होती भीती!



मानसीने सांगितलं, की मी लग्न करणार होते तेव्हा एका निर्मात्यानं मला सांगितलं, की लग्न करू नकोस. जाड होशील. मग तुला कोणी काम देणार नाही. पण, माझं असं मत होतं की, लग्नानंतर मी जाड का होईन? कारण- आताही मी काम करीत आहे आणि गेल्या २० वर्षांपासून या इंडस्ट्रीत काम करतेय. मानसीला आठ वर्षांची एक मुलगी आहे. ती म्हणाली, की मी एक आई आहे आणि तरीही मी काम करीत आहे. त्यामुळे लोकांनी सांगितलेल्या गोष्टी योग्य आहेत की नाही मला माहीत नाही. कदाचित त्या असतीलही; पण मी मला हवं तसंच आयुष्य जगणार आहे. मी फक्त करिअर करत राहणार नाहीये. मला आयुष्यात दोन्ही गोष्टी हव्या आहेत. मानसीने गायक पार्थिव गोहिलसह लग्न केलं आहे. नवऱ्याबद्दल ती म्हणाली, की मला योग्य जोडीदार मिळाला आहे. पार्थिवसह लग्न केल्याचं मला समाधान आहे. तोसुद्धा एक कलाकार आहे. तो मला समजून घेतो. आई झाल्यानंतर माझी चित्रपटांतील कारकीर्द सुरू झाली. त्यामुळे आता असे कोणतेही नियम नाहीयेत आणि ती एक खूप चांगली गोष्ट आहे.

# तेजस्वी म्हणाली, मी टक्कलही करेल!

**तेजस्वी प्रकाश हिंदी टेलिव्हिजनवरील लोकप्रिय अभिनेत्री आहे. आजवर तिने अनेक मालिकांमध्ये मुख्य भूमिका साकारत प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. हिंदीसह मराठीतही काम केलं आहे. अशातच आता तिने एका मुलाखतीत भूमिकेसाठी तिची काहीही करण्याची तयारी असल्याचं म्हटलं आहे. भूमिकेसाठी मी टक्कलही करू शकते, असे ती म्हणाली.**



जर एखाद्या भूमिकेसाठी गरज भासली तर मी टक्कलदेखील करायला तयार आहे. मी अशा गोष्टींसाठी तयार असते. इंडस्ट्रीत सगळ्यांनी प्रत्येक गोष्टीसाठी इतक्या वेगवेगळ्या पर्यायांचा शोध घेतलाय, मग ते केसांचा रंग वेगळा दाखवायचा असो, टक्कल दाखवायचं असो किंवा सोनेरी रंगाचे केस दाखवायचे असो. पण, अजूनतरी प्रत्यक्षात कोणी मला हे करायला सांगितलं नाही; पण कधी जर सांगितलं तर मी नक्कीच ते करेन, असे ती म्हणाली. तेजस्वी ही हिंदी टेलिव्हिजनवरील लोकप्रिय चेहरा असून तिने आजवर 'स्वरागिनी', 'रिश्ते लिखेंगे हम नये', 'सिलसिले बदलते रिश्तों का', 'थपकी प्यार की', 'कसम', 'पेहरेदार पिया की', 'संस्कार', 'कर्ण संगीनी', 'ससुराल सिमर का', 'नागीन ६', 'सेलिब्रिटी मास्टर शेफ', 'खतरो के खिलाडी', 'बिग बॉस' यांसारख्या मालिकांमध्ये व रिॲलिटी शोमध्ये काम केलं आहे. तेजस्वी प्रकाशने मराठीतही काम केलं आहे. तिने 'स्कूल कॉलेज आणि लाईफ', 'मन कस्तुरी' यांसारख्या चित्रपटांत काम केलं आहे. तिच्या खासगी आयुष्याबद्दल बोलायचं झालं तर सध्या ती अभिनेता करण कुंद्रासह रिलेशनशिपमध्ये आहे.

गुड इव्हिनिंग City

११ ऑगस्ट २०२५, सोमवार

# वैद्यकीय निष्काळजी कमिटी जाहीर

**बुलढाणा, ११ ऑगस्ट (गुड इव्हिनिंग सिटी) :** राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या निर्देशानुसार बुलढाणा जिल्ह्यासाठी वैद्यकीय निष्काळजी कमिटीची घोषणा करण्यात आली आहे.

वैद्यकीय निष्काळजी कमिटी मध्ये वैद्यकीय क्षेत्रातील मंडळीची निवड करण्यात आली आहे. वैद्यकीय निष्काळजी कमिटीच्या सदस्यांच्या निवडी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.दत्तात्रय बिराजदार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहीर केली आहे. या समितीचे कामकाज जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.दत्तात्रय बिराजदार यांच्या अध्यक्षतेखाली चालणार आहे. यामध्ये पाच सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये वैद्यकीय निष्काळजी कमिटीचे सदस्य डॉ.सचिन पी. बासेकर, डॉ.अनंता मगर, डॉ.अजित सिरसाट, डॉ.सुनिल विधाते, सदस्य–सचिव डॉ.भागवत भुसारी यांचा समावेश आहे.

# शेतकऱ्याला लोटांगण घालून मते मागायची अन् निवडून आल्यावर लाथा?



## कुणावर संतापले राहुल बोंद्रे??

**बुलडाणा, ११ ऑगस्ट (गुड इव्हिनिंग सिटी) :** चिखली तालुक्यात झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसाने झालेल्या शेतीच्या नुकसानाची तात्काळ पंचनामे करून मदत देण्याची मागणी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल बोंद्रे यांनी केली आहे. त्यांनी याबाबत त्यांच्या सोशल मीडिया अकाऊंटवर पोस्ट केली आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, चिखली तालुक्यात शेतकऱ्यांचा आक्रोश, सरकारचे मौन ! चिखली तालुक्यातील मौजे पांढरदेव, अंबाशी, भोरसा–भोरसी, वरखेड आणि आसपासच्या गावांमध्ये ढगफुटी सदृश पावसाने पिके आणि घरांचे प्रचंड नुकसान झाले. शेतकरी संकटात आहेत.काही दिवसांपूर्वीच भरोसा येथील थुट्टे दांपत्याने आत्महत्या केली होती. या दोन भीषण घटना घडल्यानंतरही राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे तालुक्यात येऊन फक्त पक्षाच्या कार्यक्रमात हजेरी लावतात, पण शेतकऱ्यांच्या वेदनांकडे दुर्लक्ष करतात !शेतकऱ्यांच्या पायाशी पडून मतं मागायची, आणि निवडून आल्यावर त्यांनाच लाथा मारायच्या – ही भाजप सरकारची नीती कितपत योग्य ? शेतकऱ्यांचा अंत पाहू नका ! तातडीने, कुठलाही पंचनामा न करता सर्व नुकसानग्रस्तांना सरसकट मोबदला द्या, अन्यथा शेतकऱ्यांचा संताप तुमची हुकुमशाही उध्वस्त केल्याशिवाय थांबणार नाही!चिखली तालुक्यातील पांढरदेव, अंबाशी, भोरसा–भोरसी, वरखेड आणि आसपासच्या गावांमध्ये येथे ९ ऑगस्ट रोजी सकाळी ११ ते १.३० दरम्यान मोठ्या प्रमाणात ढगफुटी झाली. झालेल्या मुसळधार पावसाने शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून गावकऱ्यांच्या घरात पाच ते सात फूट इतके पाणी साचले आहे. सरकारने तातडीने पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी केली आहे.खरीप हंगामात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी खर्च करून सोयाबीन , कापूस , तूर, उडीद, मुंग या पिकांची लागवड केली आहे. मात्र ऐन पेरणीनंतर दोन महिन्याचा कालावधी होत नाही तर पांढरदेव येथे ढगफुटी झाली. यामुळे शेतकऱ्यांची उभी पिके पाण्याखाली गेली असून शेती पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. तसेच घरांचे, रस्त्यांचे आणि जनावरांचीही प्रचंड हानी झाली आहे. यामुळे ग्रामस्थ आर्थिक व मानसिक संकटात सापडले आहेत. सरकारकडे तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्तांना योग्य व त्वरित भरपाई द्यावी, शेतकरी व गावकऱ्यांच्या पुनर्वसनासाठी ठोस योजना राबवून पांढरदेवकरांचे अश्रू पुसावेत, तातडीने पंचनामे करून मदत जाहीर करावी अशी मागणी जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राहुल बोंद्रे यांनी केली आहे. अन्यथा सर्व शेतकरी बांधवांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा दिला आहे.

# स्वातंत्र्य दिनी वामनदादा कर्डक जयंती कार्यक्रमाचे आयोजन

## लोक कलावंताची रॅली व गायनाचा कार्यक्रम

**बुलढाणा, ११ ऑगस्ट (गुड इव्हिनिंग सिटी) :** महाकवी वामनदादा कर्डक बहुउद्देशीय प्रतिष्ठानच्या वतीने १५ ऑगस्ट रोजी बुलडाणा येथे महाकवी वामनदादा कर्डक यांचा जयंती उत्सव कार्यक्रम साजरा करण्यात येत आहे. मनाला मोहिनी घालणारी अथवा भुरळ पाडणारी गिते लिहून, गाऊन व असंख्य गीतांची रचना करून सांस्कृतिक क्षेत्रात वामनदादा अजरामर झाले. बुलढाणा जिल्हा ही वामनदादांची कर्मभुमी असून, त्यांच्या जयंती दिनानिमित्त त्यांच्या चाहत्यांच्या वतीने बुलडाणा येथील वामनदादा कर्डक स्मारक एडेड हायस्कूल समोर विविध कार्यक्रम आयोजित केले आहे. या कार्यक्रमाला बुलडाण्याचे आमदार संजय गायकवाड, मुख्याधिकारी गणेश पांडे, ॲड.सुमित सरदार, प्रा.कमलेश खिल्लारे, पत्रकार अरुण जैन, दादाराव गायकवाड, दिलीप भाऊ जाधव, प्राचार्या विजयालक्ष्मी वानखेडे, इंजिनियर विजय मोरे, डॉ.गोविंद गायकी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. तर विशेष उपस्थितीमध्ये पत्रकार अजय बिल्लारी, संदीप चव्हाण, संदीप वानखेडे, संजय जाधव, अशोक दाभाडे, आशिष खरात, कुणाल पैठणकर, रवींद्र साळवे, मिलिंद वानखेडे,



बाबुराव सरदार, निलेश राऊत, राहुल कासारे, अमोल खरे, पी.आर.इंगळे, अविनाश मेश्राम, हर्षनंद खोब्रागडे, पंजाबराव गायकवाड, ॲड.गणेश इंगळे यांची उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाचे प्रारंभी जयस्तंभ चौक ते महाकवी वामनदादा कर्डक यांच्या पुतळ्या पर्यंत पारंपरिक वेशभूषेत कलावंताची रॅली काढण्यात येणार आहे.त्यानंतर मान्यवरांचे मार्गदर्शन व नंतर गीत गायनाचे कार्यक्रम होतील. या कार्यक्रमास मोठ्या संख्येनी उपस्थित राहावे असे आवाहन लोककवी वामनदादा कर्डक बहुउद्देशीय प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

# मोताळा तहसील येथे नायब तहसिलदार देण्यात यावे

## भाजपा तालुकाध्यक्ष सचिन शेळके पाटील यांची मागणी



**मोताळा, ११ ऑगस्ट (गुड इव्हिनिंग सिटी) :** तहसील येथे चार नायब तहसीलदारांपैकी गेल्या तीन महिन्यापासून एकही नायब तहसीलदार नाही चारही नायब तहसीलदार यांच्या जागा रिक्त आहे. मोताळा तालुक्यातील शाळेतील विद्यार्थ्यांची कामे, शेतकऱ्यांचे पीक कर्जाचे कामे व इतर तहसील संबंधित कागदपत्रे यासाठी तालुक्यातील शेतकरी बांधव व विद्यार्थी यांना त्रास सहन करावा लागत आहे. तरीही मोताळा तहसील येथे लवकरात लवकर कायमस्वरूपी नायब तहसीलदार देण्यात यावे. तसेच २०२४–२५ चे अतिवृष्टीचे राहिलेले उर्वरित अनुदान तालुक्यातील शेतकऱ्यांच्या खात्यात लवकरात लवकर जमा करण्यात यावे. अशा मागणीचे निवेदन, मोताळा तालुका भारतीय जनता पार्टीच्या वतीने सचिन शेळके पाटील यांनी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना बुलढाणा येथे दिले.

# अनोळखी युवकाचा मृतदेह आढळला

**डोणगाव, ११ ऑगस्ट (गुड इव्हिनिंग सिटी) :** येथून जवळचं असलेल्या शेलगाव देशमुख येथे ९ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजताच्या दरम्यान एका २५ ते ३० वयोगटातील अनोळखी युवकाचा मृतदेह आढळून आला. शेलगाव देशमुख गावाजवळून वाहणाऱ्या नदीच्या पाण्यावर हा मृतदेह तरंगताना दिसला.

सदर घटनेची माहिती डोणगाव पोलीस स्टेशनला दिली. माहिती मिळताच ठाणेदार अमरनाथ नागरे, सरपंचपती दिलीप आखरे, पोलीस पाटील संतोष सोनुने, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष खंडू सदार सह पोलीस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी दाखल होऊन मृतदेहाचा पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी मेहकर ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला. सदर मृतदेह अर्धवट जळालेल्या अवस्थेत असून घातपात की आत्महत्या याबाबत शंका निर्माण झाली आहे. सदर मृतकाची ओळख पटविण्याचे आवाहन डोणगाव पोलीस स्टेशन अंतर्गत करण्यात आले आहे.

# येळगाव धरणात ७५ टक्के जलसाठा



**बुलढाणा, ११ ऑगस्ट (गुड इव्हिनिंग सिटी) :** पंधरा दिवसांपासून जिल्ह्यात पावसाने दडी मारलेली होती. मात्र गेल्या दोन दिवसांत अनेक भागात मुसळधार पाऊस पडला. त्यामुळे मोठे प्रकल्पात असलेला ३९.९२टक्के जलसाठा आता ६४.३३ टक्क्यावर आला आहे. सात मध्यम प्रकल्पातील जलसाठा ६८.४५ वरुन ७७.२२ तर ४१ लघु प्रकल्पातील साठा ५४.०५ वरुन ६३. ५५ टक्क्यावर येऊन पोहोचला आहे. या सर्व प्रकल्पात असलेला ५१.६८ टक्के जलसाठा ६८.०६ टक्क्यांवर पोहोचला आहे. सध्या जिल्हयातील मोठे, मध्यम वलघु प्रकल्पात दोन लाख ४१ हजार ८८० दलघमी इतक्या असलेल्या जलसाठ्यात भर पडली आहे. आज तीन लाख १८ हजार ५१० दश लक्ष घनमीटर इतका हाजलसाठा असल्याने बहुतांश ठिकाणची सिंचनाची व पिण्याच्या पाण्याची टंचाई दूरझाली आहे. जिल्हयातील पावसाचे प्रमाणगतवर्षीपेक्षा कमीच आहे. गतवर्षी १०ऑगस्ट पर्यंत ४६४.४ मिमी पाऊस पडला होता यावर्षी ३६५.८ मिमी पाऊस पडलाआहे. गतवर्षीपेक्षा ९८.६ मिमी पाऊस कमीपडला आहे. बुलडाणा शहरासह पंधरा गावांनापाणीपुरवठा करणाऱ्या स्व.रामसिंगदेवसिंग भोंडे जलाशयात दोनदिवसातील पावसामुळे ७५ टक्केजलसाठा उपलब्ध झाला आहे. अजिसपूर, नांद्राकोळी, साखळी, येळगाव, भादोला, सागवन, सुंदरखेड, जांभरुण, माळ विहीरआदी गावांनाही येथूनच पाणी पुरवठा केल्या जातो. धरणाची जलसाठा क्षमता १२.४० दशलक्ष घनमीटर इतकी आहे.

# अवैध दारु विक्री करणाऱ्यावर पोलीसांची कारवाई

**सिंदखेडराजा, ११ ऑगस्ट (गुड इव्हिनिंग सिटी) :** सिंदखेडराजा–मेहकर रोडवर असलेल्या हॉटेल न्यू फौजी ढाब्यावर स्थानिक गुन्हे शाखेने व सिं. राजा पोलिसांनी अवैध दारू विक्री करणाऱ्यांवर कारवाई करून ३९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. १० ऑगस्ट रोजी ही कारवाई करण्यात आली.

पोलीस अधीक्षक बुलढाणा निलेश तांबे, अपर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पोलीस निरीक्षक सुनील अंबुलकर यांच्या आदेशानुसार, सिंदखेड राजा पोलिसांनी अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कारवाई केली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस नाईक युवराज राठोड यांच्या फिर्यादीनुसार, हॉटेल न्यू फौजी ढाबा येथे अवैध दारूविक्री सुरूहोती. या कारवाईमध्ये पोलिसांनी महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ ई गुन्हा दाखल केला. घटनास्थळावरून सुमारे ३९०० रुपयांची विदेशी दारू जप्त करून एकनाथ अशोक पालवे विरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला आहे.



31 Aug LAST PAGE_Layout 1 8/11/2025 5:04 PM Page 1



# डिजिटल मिडिया परिषदेचे पहिले राज्यव्यापी अधिवेशन १४ सप्टेंबर रोजी संभाजीनगर येथे होणार :एस.एम.देशमुख

**मुंबई, ११ ऑगस्ट (गुड इव्हिनिंग सिटी) :** अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचा उपक्रम असलेल्या डिजिटल मिडिया परिषदे चे पहिले राज्यव्यापी अधिवेशन १४ सप्टेंबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे होणार असल्याची माहिती एस.एम.देशमुख यांनी दिली आहे..

डिजिटल मिडियात काम करणारया पत्रकारांसाठी अ. भा. मराठी पत्रकार परिषदेने डिजिटल मिडिया परिषद या नावाचा स्वतंत्र विभाग सुरू केला आहे.. राज्यातील ३० जिल्ह्यात आता डिजिटल मिडियाच्या शाखा सुरू झाल्या असून या माध्यमातील २००० पत्रकार परिषदेशी जोडले गेलेले आहेत.. उर्वरित जिल्ह्यात शाखा स्थापन करण्याची प्रकिया सुरू आहे. परिषदेशी जोडल्या गेलेल्या या पत्रकारांना एकत्र करून डिजिटल माध्यमांची तांत्रिक माहिती देणे, तसेच परस्पर सुसंवाद, येणारया अडचणी यांची चर्चा करणे हा या अधिवेशनाचा उद्देश आहे.

१४ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता एकनाथ रंगमंदिर क्रांती चौक येथे मान्यवरांच्या हस्ते अधिवेशनाचे उद्घाटन होईल. डिजिटल मिडिया विश्वातील मान्यवरांची व्याख्यानं होतील.. तसेच उत्कृष्ट युट्यूब आणि पोर्टल चालविणारया दहा संपादकांचा अधिवेशनात सन्मान करण्यात येणार आहे.. सबस्क्राईबर्स, व्ह्यूवर्सची संख्या, तांत्रिक बाजू, बातम्यांची निवड आणि लोकांचे प्रश्न उत्तम पध्दतीनं मांडणारया संपादकांची निवड करून त्यांचा गौरव केला जाईल.

डिजिटल मिडिया परिषदेची अद्याप राज्य कार्यकारिणी झालेली नाही. अधिवेशनात राज्य कार्यकारिणी निवडली जाणार आहे.

डिजिटल मिडियाला सरकारने जाहिराती देण्याचा निर्णय घेतला असला तरी या जीआर मध्ये युट्यूब चँनल्स तसेच न्यूज पोर्टलचा उल्लेख नाही... ही बाब मुख्यमंत्र्यांच्या नजरेस आणून देत त्यांना जाहिराती मिळाव्यात असा प्रयत्न केला जाणार असल्याचे तसेच डिजिटल पत्रकारांना अधिस्वीकृती मिळावी यासाठी देखील सरकारकडे पाठपुरावा केला जाणार असून अधिवेशनात तसे ठराव मांडले जाणार आहेत. प्रिन्ट आणि इलेक्ट्रॉनिक मिडियाचे अनेक प्रश्न अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेने मार्गी लावले आहेत.. त्याच प्रमाणे डिजिटल मिडियाला भेडसावणारे प्रश्न हाती घेऊन डिजिटल मिडिया परिषद त्यांचा पाठपुरावा करणार आहे. अधिवेशनात त्यासंबंधी देखील चर्चा आणि विचारविनिमय होणार आहे.

डिजिटल मिडियाच्या या पहिल्या अधिवेशनास डिजिटल माध्यमातील पत्रकारांनी मोठ्या संख्येनं उपस्थित राहावं असं आवाहन परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख डिजिटल मिडिया परिषदेचे अध्यक्ष अनिल वाघमारे, विभागीय सचिव रवी उबाळे, कार्यक्रमाचे निमंत्रक आणि संभाजीनगर जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष बालाजी सूर्यवंशी यांनी केले आहे.

# दोन गटात तुंबळ हाणामारी; परस्परविरोधी तक्रारीवरुन गुन्हा

**जळगाव जामोद, ११ ऑगस्ट (गुड इव्हिनिंग सिटी) :** तालुक्यातील एका गावात ८ ऑगस्ट रोजी रात्री सुमारे आठ वाजता किरकोळ वादाचे रूपांतर दोन गटांत हाणामारीत झाले. या घटनेतून जळगाव जामोद पोलिस ठाण्यात परस्परविरोधी तक्रारी नोंदविण्यात आल्या असून, पोलिसांनी दोन्ही गटातील आरोपींविरुद्ध पोक्सो कायद्यासह विविध कलमांखाली गुन्हे दाखल करून अटक केली आहे.




पहिल्या प्रकरणात, अल्पवयीन मुलगी मैत्रिणीसह गावातील शाळेत सर्कस पाहायला गेली असता, रमेश साहेबराव शिंदे (४५), मंगेश सुभाष सोळंके (१८), एक अल्पवयीन मुलगा यांच्यासह एकूण नऊ आरोपींनी अश्लील कृत्य करण्याचा प्रयत्न केला.

पीडितेच्या तक्रारीवरून त्यांच्यावर भारतीय न्याय संहितेच्या कलम ७४, ७५, ११८(१), ११५(२), १९०, १९१(१), १९१(२), ३५२ सह पोक्सो कलम ८, १२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. दुसऱ्या प्रकरणात, फिर्यादी महिलेने तक्रार दिली की, त्यांच्या दिराच्या अल्पवयीन मुलीसोबत अश्लील कृत्याचा प्रयत्न करण्यात आला. या प्रकरणात शुभम साईनाथ शिंदे (२१), अमित साईनाथ शिंदे (१९) यांच्यासह आठ आरोपींवर त्याच कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला. दोन्ही प्रकरणातील आरोपींना पोलिसांनी अटक केली असुन पुढील कारवाई पोलीस करित आहेत.

# प्रवासी वाहनाच्या धडकेत एक ठार

**जळगाव जामोद, ११ ऑगस्ट (गुड इव्हिनिंग सिटी) :** भेंडवळ–मडाखेड रस्त्यावर भरधाव प्रवासी वाहनाने पादचाऱ्यास जोरदार धडक दिल्याने ७५ वर्षीय वृद्धाचा घटनास्थळीच मृत्यू झाला. ही घटना ७ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेपाच वाजताच्या सुमारास घडली.

भेंडवळ गावातील रहिवासी दौलत भारसाकडे (७५) हे पायी जात असताना, रतन वक्टे यांच्या गॅरेजसमोरून जाणाऱ्या मार्गावर (एमएच–२८, बीडब्ल्यू २५९६) क्रमांकाच्या खासगी प्रवासी वाहनाने पाठीमागून धडक दिली. या अपघातात ते गंभीर जखमी होऊन घटनास्थळीच मृत्युमुखी पडले. वाहनचालक संतोष अशोक बावस्कर (३०), रा. चावरा) याने निष्काळजीने वाहन चालवून हा अपघात घडविल्याची तक्रार मृतकाचा मुलगा सतीष दौलत भारसाकडे यांनी जळगाव जामोद पोलिस ठाण्यात नोंदवली. त्यानुसार, आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीला अटक करून गाडी जप्त करण्यात आली आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांवर भाजपचा झेंडा फडकविण्यासाठी सज्ज व्हा : ना.बावनकुळे



**बुलढाणा, ११ ऑगस्ट (गुड इव्हिनिंग सिटी) :** राज्याचे कार्यक्षम महसूल मंत्री तथा भाजपचे माजी प्रदेशाध्यक्ष मा.ना.चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुलढाणा जिल्हा दौरा प्रसंगी ९ ऑगस्ट रोजी स्थानिक गर्दे वाचनालय सभागृह येथे बुलढाणा जिल्ह्यातील भाजपा पदाधिकारी यांच्याशी संवाद मेळाव्याद्वारे संवाद साधला.

स्थानिक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्ष पूर्ण ताकतीने मैदानात उतरला पक्ष संघटन अधिकाधिक मजबूतीवर भर दिला जात आहे. भाजपचे धडाकेबाज, पावरफुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुलढाणा जिल्हा दौऱ्या प्रसंगी बुलढाणा भाजपच्या वतीने आयोजित भाजपा भाजपा पदाधिकारी संवाद मेळाव्यात पदाधिकारी यांना मार्गदर्शन केले.

भाजपा पक्षाने जनतेच्या आशीर्वादाने व कार्यकर्त्यांच्या मेहनतीने केंद्रात व राज्यात सत्ता स्थापण केलेली आहे, आता त्याच कार्यकर्त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीत सत्तेत बसविण्यासाठी भाजपचे सर्व नेते, मंत्री, आमदार, खासदार हे कटिबद्ध असून कार्यकर्त्यांसाठी मेहनत घेणार आहेत. राज्यातील व केंद्रातील सरकारने केलेल्या ऐतिहासिक विकास कामांमुळे विरोधकांकडे जनतेसमोर जाण्यासाठी आता कुठलेही मुद्दे राहिलेले नसून ते आता हतबल झालेले आहेत, असे ते यावेळी म्हणाले.

# कीर्तनकारांचा सन्मान करण्याची संधी मिळणे हे मोठे अहोभाग्य : केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव

**बुलढाणा, ११ ऑगस्ट (गुड इव्हिनिंग सिटी) :** वारकरी संप्रदायाचे पाईक आणि सन्मार्गाचे पथदर्शक असलेल्या कीर्तनकारांचा सन्मान करण्याची संधी मिळणे हे मोठे अहोभाग्य मला प्रा.डॉ.सचिन जाधव यांच्या त्यांच्या मित्र मंडळा तर्फे मिळाले, असे प्रतिपादन केंद्रीय आयुष, आरोग्य, कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केले.

मेहकर येथील कृषी उत्पन्न बाजार समिती जवळील भूमिपुत्र प्रतापराव जाधव शेतकरी भवनात गजर कीर्तनाचा सन्मान कीर्तनकाराचा हा आगळावेगळा व कृतज्ञता व्यक्त करणारा सोहळा प्राध्यापक सचिन जाधव मित्रपरिवाराच्यावतीने त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आज १० ऑगस्टला शेगाव येथे केले होते.

केंद्रीय मंत्री यांनी सर्वप्रथम गोमातेचे पूजन केल फटाक्यांची आतिषबाजी करत जिल्ह्यातील ३५० कीर्तनकारांचे भावपूर्ण स्वागत करण्यात आले. माजी आमदार संजय रायमुलकर, शशिकांत खेडेकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.



दिढे मामा, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बळीभाऊ मापारी, विजयराव जाधव, बाजार समितीचे सभापती माधवराव जाधव, राजश्रीताई जाधव, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख ऋषिकेश जाधव, खरेदी विक्री संस्थेचे अध्यक्ष शत्रुघ्न निकम, मनोज सावजी, शिवसेनेचे तालुका प्रमुख सुरेशतात्या वाळूकर, लोणारचे भगवानराव सुलताने, शहर प्रमुख जयचंद बाठीया, पांडुरंग सरकटे, समाधान साबळे, युवासेनेचे भूषण घोडे प्रामुख्याने उपस्थित होते. ३५० कीर्तनकारांना विठ्ठल पांडुरंगाची मूर्ती, स्मृतिचिन्ह आणि वस्त्रे देऊन प्रतापराव जाधव, संजय रायमुलकर, ऋषिकेश जाधव, प्रा.डॉ.सचिन जाधव यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले. १०० जोडप्यांच्या हस्ते सर्व कीर्तनकारांचे पूजन करण्यात आले. कीर्तनकार आणि उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.गजानन घायाळ यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सचिन जाधव मित्र मंडळाचे संतोष चनखोरे, जीतुभाउ सावजी, कैलास जाधव, गजेंद्र मापारी, सागर जाधव, संदीप मेटांगळे, युवराज वाघ पांडुरंग मुंडे, कैलास राऊत ,रामेश्वर निकम, अॅड.रामेश्वर पळसकर, गजानन निकम, प्रवीण जाधव, ललित रहाटे, अरुण गीते, मोहन बोडखे यांनी परिश्रम घेतले.

# शिव महापुराण कथा मनोरंजन साधन नाही : बालसंत श्री दिपशरणजी महाराज

**बुलढाणा, ११ ऑगस्ट (गुड इव्हिनिंग सिटी) :** संततीमुळे विचार आई–वडिलांच्या डोळ्यात अश्रू येत असतील तर ईश्वर सुद्धा माफ करणार नाही. कर्माची फळे भोगावीच लागतील, म्हणून कथेतून काही संस्कार घ्यावे व अमंलात आणावे, म्हणून कोणतेही सत्संग किंवा शिवमहापुराण कथा केवळ मनोरंजनाचे साधन नाही असे प्रतिपादन बालसंत श्री दीप शरणजी महाराज यांनी शिवमहापुराण कथेचे सहावे पुष्पगुंतांना केले.




युवा सेनेचे प्रमुख नेते कुणाल गायकवाड यांनी दीपशरण महाराजांचे पूजन करून माल्याअर्पण केले. यावेळी चंपालाल शर्मा आणि सिद्धार्थ शर्मा यांनी कुणाल गायकवाड यांचा हार घालून सन्मान केला.

आजच्या दिवसाचे व्यवस्थापक गुरव समाज महिला मंडळ व लेवा पाटील सखी यांच्याकडे होते. व्यासपीठ तयारी ज्योतिर्लिंग सजावट आरती व महाराजांचे स्वागत हे सर्व कामे या महिला मंडळाकडे होते. प्रसाद वितरण परशुराम ब्राह्मण समाज महिला मंडळांनी केले. माधुरी घोरपडे, सुनंदा कावळे, नलिनी शिंदे, मंगला इंगळे, कुसुम चिंचोळकर, कुंदा पाटील, अंबिका काटकर, नयना पाटील, यांनी व्यासपीठावर दीपशरण महाराजांचे पूजन केले व माल्यार्पन केले, नंतर आरती केली. महाराजांनी कथेचा विस्तार करताना आई–वडील मुलांसाठी किती वेदना सहन करतात परंतु तीच मुले मोठी झाल्यावर आई–वडिलांना दुःख देतात व अश्रू काढायला लावतात. आईचे महत्व सांगताना महाराजांनी ओ माँ तू कितनी अच्छी है हे गीत म्हटले तेव्हा श्रोत्यांच्या डोळ्यातून अश्रूधारा वाहत होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रकाश चंद्र पाठक यांनी केले महाप्रसादाचे मुख्य यजमान रामनिवास यादव हे कुटुंब आहे. मीना व रामनिवास यादव यांनी पूर्ण खर्च केला.

# एकलारा, कोलारा, मेरा मंडळाबरोबरच तालुक्यात सरसगट मदत द्या

## चिखली तालुका काँग्रेस किसान सेलची मागणी; तहसिलदारांना दिले निवेदन

**चिखली, ११ ऑगस्ट (गुड इव्हिनिंग सिटी) :** हुमणी अळी तसेच ढगफुटी सदृश्य पावसामुळे एकलारा, कोलारा, मेरा मंडळासोबतच चिखली तालुक्यातील शेतकऱ्यांसमोर संकट उभे राहिले आहे. चिखली तालुक्यातील विशेषतः एकलारा, कोलारा व मेरा मंडळातील मौजे पांढरदेव, भोरसा भोरसी, वरखेड, आमखेड, रानअंत्री, सावंगी गवळी, मंगरूळ नवघरे, घानमोड, नानमोड, आंबाशी, पाटोदा, खैरव, तेल्हारा, बोरगांव काकडे, यासह इतर गावातील शेती पिके पूर्णतः खरडुन गेले. तसेच नदी–नाले तुडूंब भरून, घरामध्ये ३–७ फुट पाणी शिरल्यामुळे अन्नधान्य कपडे, फर्नीचर आणि घरगुती साहित्यांचे मोठया प्रमाणे नुकसान झाले आहे. तरी शेतकऱ्यांना तात्काळ सरसगट मदत देण्यात यावी, अशी मागणी चिखली तालुका काँग्रेस किसानसेलच्या वतीने तहसिलदारांकडे करण्यात आली आहे. चिखली तहसिलदार यांना सोमवार ११ ऑगस्ट रोजी दिलेल्या निवेदनात नमूद आहे की, शेतकऱ्यांचे उभे पिक पाण्याखाली बुडल्यामुळे 'ओला दुष्काळ' परिस्थीती निर्माण झाली. बाधीत गावांमध्ये तातडीने पंचनामे करून आर्थीक मदत देण्याची नागरीकाकडून मागणी होत आहे. या आपत्तीमुळे शेतकरी व गावकरी आर्थीक, मानसिक दृष्ट्या गंभीर संकटात सापडले आहेत. त्यामुळे शासनाने तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना व बाधित नागरीकांना मदत जाहीर करावी. अन्यथा चिखली काँग्रेस किसान विभागाच्या वतीने शेतकऱ्यांसाठी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, अशा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. याप्रसंगी तालुका किसान काँग्रेसचे अध्यक्ष समाधान आकाळ, तालुका अध्यक्ष रामभाउ जाधव, माजी सभापती अशोकराव पडघान, डॉ.सत्येंद्र भुसारी, ईश्वरराव इंगळे, युवक काँग्रेसचे अंबादास भुसारी, एन.टी.भुसारी, गोपाल वाघ, षिवदास कापसे, हाबीब, विष्णु सोळंकी, समाधान म्हस्के, गजानन वाघ, अब्रार सैयद, सैयद अब्दुला सैयद लाल, सर्जेराव पडघान, ईनायतखॉ जिलालखॉ, मोहसीन खान बिस्मील्ला खान, सैयद युसूफ, अभिमान गवई, भिमराव महाराज हिवरकर, मोतीसिंग सोळंकी, संजय गिरी, आत्माराम जाधव, संतोष अंभोरे, ज्ञानेष्वर हळदे, सागर जाधव, संतोष सोळंकी, लक्ष्मण भिसे यांच्यासह यांच्यासह शेकडो काँग्रेस पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.



सायंदैनिक गुड इव्हिनिंग City
हे पत्रक प्रकाशक, मालक तथा कार्यकारी संपादक रणजीतसिंग राजपूत 9850377344 यांनी कल्पक प्रिंटर्स, सराफा लाईन, बुलडाणा येथे छापून गुड इव्हिनिंग सिटी कार्यालय, गाळा क्र.२, पत्रकार भवन , बुलडाणा येथे प्रसिध्द केले. *कायदेशीर बाबी उद्‌भवल्यास बुलडाणा न्यायालयाअंतर्गत. फोन नं. (07262) 241026 संपादक : हरिदास उंबरकर 9763469184. RNI Reg.No.MAHMAR/2012/46689